# 18 डिसेंबर

## आजचा सुविचार :

"स्वत:चा विकास करा. ध्यानात ठेवा,
गती आणि वाढ हीच जिवंतपणाची लक्षणे आहेत".

## आजचे पंचांग:

वार – शनिवार
दिनांक : 18 डिसेंबर 2021
तिथी – मार्गशीर्ष
नक्षत्र – रोहिणी
सुर्योदय – सकाळी 7.07 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 6. 03 वाजता

## आजचे दिनविशेष :

1) अल्पसंख्याक हक्क दिन
2) 2006 : संयुक्त अरब अमिरातींमध्ये (UAE) प्रथमच निवडणूका घेण्यात आल्या.
3)1890: एफ. एम. रेडिओचे संशोधक ई. एच. आर्मस्ट्राँग यांचा जन्म.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Forest – जंगल 2) Hills - डोंगर 3) Mountain - पर्वत 4) Plane – सपाट

## आजची प्रश्नमंजुषा :

1) तुम्हाला माहित असलेला सर्वात वेगवान प्राणी कोणता?
2) 'सिंह' या शब्दाला समानार्थी शब्द सांगा.
3) हवेमध्ये कोणत्या वायूचे प्रमाण जास्त आहे?
4) दोन सम संख्यांची बेरीज नेहमी ........... येते.

## बोधकथा :

### कष्टाची कमाई श्रेष्ठ

एका नगरात दोन चोर राहत होते. प्रत्येक दिवशी ते चोरी करत आणि दोन हिस्से करून वाटत असत. एक हिस्सा स्वत:साठी व दुसरा हिस्सा ईश्वराला देत असत. एका रात्री ते चोरीसाठी निघाले. बरीच भटकंती करूनही त्यांना चोरी करण्याची संधी मिळाली नाही. दोघेही थकून मंदिराच्या ओट्यावर बसले. तेथे त्यांना एक संत भेटले. संताने त्यांना परिचय विचारला तर त्यांनी स्वत:बाबत खरे सांगितले. हे ऐकून संत म्हणाला, तुम्ही जे करत आहात ते चांगले की वाईट आहे यावर कधी तुम्ही विचार केला आहे? चोर म्हणाले," आम्ही करत आहोत ते चांगलेच असणार कारण चोरी करून आम्ही जे धन किंवा वस्तू प्राप्त करतो ते आम्ही दोन भागांमध्ये वाटतो.

एक भाग आम्ही स्वत:कडे ठेवतो आणि दुसरा भाग ईश्वराला चरणी अर्पण करतो. तेव्हा त्या संताने आपल्या झोळीतून एक जिवंत कोंबडा काढला आणि त्यांना देत म्हणाला," आज तुम्ही चोरी करू शकला नाहीत त्यामुळे निराश वाटत आहात हा कोंबडा ठेवा. याचे दोन हिस्से करा एक स्वत:साठी ठेवा आणि दुसरा ईश्वरचरणी ठेवा." दोघेही चोर आश्चर्यचकित झाले संतांच्या बोलण्याचा आशय समजून म्हणाले,"महाराज इथून पुढे आम्ही चोरी न करता कष्टाची कमाई करून खाऊ आणि त्यातील एक हिस्सा ईश्वरचरणी ठेवू." दोघेही संताला नमस्कार करून निघून गेले.

**तात्पर्य :-** पापाची कमाई असंतोष आणि दु:खाचे कारण बनते तर कष्टाची कमाई मानसिक सुख, शांतता आणि आत्म्याला सुख देते.